नव्या- जुण्याचा उत्तम संगम

Amandeep Singh and **Pranav Kumar**

निसर्गाशी सुसंगत राहणे हा शाश्वत जीवनाचा निश्चित मार्ग आहे. भारताच्या उत्तरेकडील भागातील गुज्जरांनी परंपरागत संस्कृती व पद्धती सोबतच नवीन ज्ञानाला स्वीकारल्याने शाश्वत पर्यावरण व उपजिविका निश्चित होऊ शकली.

पग आणि तेहमद अगांत, उंच, कणखर, लांब पोशाख, लाल रंगाची लांब दाढी, मुखात गोजरी बोलीभाषा, मका आणि बाजरीच्या भाकरी लोण्यात बुडवून मोहक सुगंध व सरसो हे त्यांचा आहार, मातीचे कौले आणि विशिष्ट गवतांच्या साह्याने तयार केलेली सुंदर घरे, त्यांच्या उत्पादनाचे एकमेव साधन,पशुधनवर. प्रेम व करुणा पायाखालची जमीन व डोक्यावरील उघडे आकाश असे निसर्गाशी निर्माण झालेले घट्ट नाते म्हणजेच गुज्जर समाज. गुज्जर ही भटकी जमात असून सांस्कृतिक वारसाच्या दृष्टीने समृद्ध आहे. त्यांचे पोशाख, परंपरा, जगण्याची सक्य, कला आणि हस्तकला, स्थानपरत्वे वेगवेगळी आहे. जम्मू-काश्मीर राज्यात बकरवलांसह गुज्जर हा तिसरा सर्वात मोठा समुदाय आहे. २००१ च्या भारतीय जनगणनेनुसार गुजरातमध्ये ७.५ टक्के लोक गुर्जर आहेत. व्यावसायिकदृष्ट्या ६९.२ टक्के गुज्जर शेती व पशूपालन करतात. २.८ टक्के घरगुती कामगार आणि २८ टक्के इतर

शाळेचा गणवेश परिधान केलेली गुज्जरांची मुले.



क्षेत्रामध्ये गुंतलेले आहेत. दुग्ध व्यवसाय हा त्यांचा प्रमुख अर्थार्जनाचा व्यवसाय. ही जमात प्रामुख्याने पशुपालनात गुंतली आहे. त्यातील फक्त ०.७५ टक्के लोकसंख्या शहरी असून बाकीची खेड्यात राहत असून पशुधनावर अवलंबून असतात.

आहार पद्धती

गुज्जर निराळ्याच परिस्थितीत राहत असल्याने त्यांची जीवनपद्धती, अन्न व आहार पद्धती आणि जीवनाबद्दलचा दृष्टिकोन आदिवासी समाजापेक्षा वेगळा असतो. हे त्यांच्या आहारातील सवयीमधून दिसून येते. शेतीपद्धती, पीकरचनेत आणि आहारातील बदलामुळे बहुतेक समुदायांमध्ये बदल घडून आलेत तसे गुज्जर समुदायात देखील हे लक्षात येते. ते मुख्यतः दुधाव्यतिरिक्त गहू व मक्यावर अवलंबून असतात. गुज्जरचा आवडता पदार्थ म्हणजे मक्याची भाकरी व मोहरीची भाजी, कलारी, कराळ, करण इत्यादी आहे. बहुतेक गुज्जर शाकाहारी आहेत.

बाजारात जरी बहुराष्ट्रीय कंपन्यांचा व नवीन उत्पादनाचा पूर आला असल्याने लहान व्यवसाय मोडखळीस जाताना दिसतात. मात्र या जमातीत याबद्दल फार चिंता वाटत नाही. काही दशकांपूर्वी ते ज्या परिस्थितीत होते त्या स्थितीत ते अद्यापही समाधानी आहेत. उदाहरणार्थ ९८ टक्के गुज्जर नियमित गोड चहानंतर नन चहा किंवा मीठ घालून चहा पितात त्याच्या शिवाय त्यांची सकाळ सुरू होत नाही किंवा दिवस पूर्ण होत नाही. नून चहा स्थानिक औषधी वनस्पतींचे मिश्रण आहे. बाजाराच्या नैराश्यपूर्ण जीवनात स्वतःला ढकलण्यापेक्षा जे काही आपल्याजवळ आहे किंवा उत्पादित करतो त्यावर ते समाधानी असतात. डोंगराळ प्रदेशातील त्यांच्या जीवनशैलीमुळे ते निसर्गाशी एकरूप झालेले वाटतात.

पर्यावरणाचे संरक्षण

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी या जमातीने अनेक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या जनावरांसाठी चाऱ्याकरिता घनदाट जंगल आणि डोंगराळ प्रदेशावर ते अवलंबून असतात. हा समाज जंगलाशी समतोल राखून आवश्यकतेप्रमाणे जंगलाचा वापर करता व जमिनीची उत्पादकता टिकवून ठेवतो. गुज्जरांनी जंगल क्षेत्रातील महत्त्वपूर्ण जंगलाच्या शोधाकरिता आणि बेकायदेशीर अतिक्रमण काढून टाकण्याकरिता राज्य वन विभागाला मदत केली आहे. त्यांनी वृक्षाच्या कटाईचे प्रमाण कमी करून संवर्धनात मदत केली आहे. प्रवास करण्यायोग्य ठिकाणे आणि मौल्यवान वन उत्पादनाकरिता मार्गदर्शक म्हणून ते मदत करतात.

पर्यावरणाशी निगडित जीवनशैली

मका हे उष्ण कटिबंधीय पीक असून डोंगराळ भागात वाढते. स्थायिक समाज जेथे बहुसंख्य समुदाय आहे तेथे मक्याची लागवड करतो. मका हे त्यांचे प्रमुख अन्न आहे. हिवाळ्यात मक्याच्या आहारामुळे शरीरास उष्णता आणि

गुर्जरांच्या उत्तम आरोग्यासाठी मिरत मिल्कचर बाबत समजावतांना डॉ. प्रणव कुमार



ताकद मिळते. धान व गहू पिकाला पाण्याची आवश्यकता असल्याने त्यांची लागवड केल्या जात नाही. पण मका पर्वतीय भागात पिकवतात.

गुजराच्या खाण्यापिण्याच्या सवयीच वेगळ्या आहेत, आणि त्यांची जीवनशैलीसुद्धा. यामुळेच त्यांची वेगळी ओळख आहे.अन्न सार्वभौम जमात म्हणून त्यांना गणले जाते.



पशुधनाचा उत्तम सांभाळ करण्याच्या पध्दती शिकण्यास पुरुक उत्साही.

गुज्जर उंच भूभागावर अत्यंत पौष्टिक मक्याची लागवड करतात आणि त्यामुळे स्थानिक वनस्पतिमध्ये बदल होत नाही. मक्याचा कडबा जनावरांसाठी चारा म्हणून वापरला जातो. स्थलांतरित जीवनशैलीमुळे उन्हाळ्याच्या वेळी त्यांच्या जनावरांना या भूभागावर नेतात व हिवाळ्यात चाऱ्यासाठी मैदानी प्रदेशात परत आणतात. ते माती व गवतापासून कुड्या नवाचे अस्थाई घर तयार करतात आणि जनावरांना चाऱ्यावर जगवितात. जनावरांपासून मिळणाऱ्या शेणखत जमिनीला परत देवून जमिनीची उत्पादकता रासायनिक खताचा कमी वापर करून वाढवतात. शेणखत मिळविण्यासाठी मैदानी प्रदेशातील लोक गुज्जर यांना रहायला तात्पुर्ती जागा देतात. उंच प्रदेशातून परत आल्यानंतर त्यांच्या जनावरांचे शेणखतामुळे नैसर्गिक समतोल राखला जातो. ते कुरण आणि चराई यात चांगला समन्वय निर्माण करतात. पशुधन वाढीसाठी गुज्जर हा प्राथमिक गट असून ते मुख्यत्वे पशुपालनावर अवलंबून असतात. गुज्जर जमातीत पशुधनाची संख्या दर्जाचे प्रतीक आहे. याशिवाय ते म्हशींची व दुधाची खरेदी विक्रीवर आर्थिक व्यवहार करतात. गुज्जर म्हशींबाबत विशेष लगाव ठेवतात. कारण म्हशीत कठीण परिस्थितीचा सामना करण्याची क्षमता असून दुधात अधिक स्निग्ध असतात. गुज्जर म्हशीच्या दुधाचा वापर मूल्यवर्धनासाठी करून तूप, लोणी, दही, पनीरसारखी प्रक्रिया करतात आणि अतिरिक्त उत्पादन नफ्यासाठी विकतात.

गुज्जरांसाठी उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री होय. त्यांचेकडे ३०-४० जनावरे असल्यामुळे त्यांचे उत्पादन व आर्थिक स्थिती स्थिर आहे. दूध स्वयं उपभोगासाठी व मूल्यवर्धित करून विक्री केली जाते. जरी मार्केटमध्ये अमूल, मदर डेअरी, वेर्का इत्यादींनी मूल्यवर्धित दुग्ध उत्पादने आणले तरी या भागातील लोक दूध आणि दुग्ध पदार्थांसाठी शुद्धतेमुळे गुज्जरांवर अवलंबून असतात.

गुज्जर त्यांचे पारंपारिक ज्ञान संरक्षित करताना नवीन वैज्ञानिक ज्ञानासाठीही खुले आहेत. जम्मू काश्मीरच्या पशुसंवर्धन विभाग, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी संशोधन केंद्र, शेर-ए-काश्मीर कृषी विद्यापीठाद्वारे त्यांना स्वच्छ दूध उत्पादन, पशु आरोग्य, वैयक्तिक व प्राणी स्वच्छता, पशु पोषण इत्यादींवर प्रशिक्षण देतात. त्यांनी उत्तम प्रजनन तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला आहे.

गुज्जरांचा हा व्यवसाय मोठ्या उद्योगामुळे प्रभावी होत नसून त्यांच्या विक्रीचा या समाजाच्या नफ्यावर फरक पडत नाही. एक कुटुंब दररोज १०० लिटर दूध तयार करते आणि स्थानिक बरेच पर्याय उपलब्ध असूनही १०० लीटर नेहमी त्याच नफ्यासह विकले जाते. गुज्जरांनी तयार केलेल्या तुपाला जम्मू काश्मीरमध्ये सर्वाधिक मागणी आहे. बाजारपेठेतील किंमतीपेक्षा लोक जास्त किंमत मोजतात. तुपाचा स्वाद व सुगंध अत्यंत विशेष असून त्यात रासायनिक संरक्षक (Preservative) पासून मुक्त असते. चुलीवरील हळूहळू तयार केलेल्या तुपात स्वाद व एकसंधता येते. येथे आणखी एक गोष्ट समजून घेण्याची आवश्यकता आहे की दुधाचे मूल्यवर्धन कोणत्याही रसायनांचे आणि संरक्षणशिवाय केले जाते. ते मानवी आरोग्यासाठी पर्यावरण अनुकूल पद्धती वापरतात.

यांच्याकडे केवळ प्राणी संगोपन करण्याची कलाच नसून त्यांना बरे करण्याची कला देखील आहे. ते स्वदेशी तंत्रज्ञानाचे मालक आहेत. त्यांनी मानव व प्राण्यांच्या आजारांवर उपचार करण्यासाठी नैसर्गिक औषधी वनस्पतींचा उपयोग केला. हे दान त्यांच्या पूर्वजांनी नविन पिढ्यांना दिले आहे. नैसर्गिक वनस्पतींचा वापर निश्चितपणे त्यांच्या जीवनावर आणि पशुधनावर होतो. दूध उत्पादने हानिकारक औषधांच्या अवशेषांपासून दूषित होत नाहीत. परिणामी वातावरणातील परिजैविके आणि रसायनाचे प्रमाण कमी होते.

निष्कर्ष

गुज्जर समाजाची त्यांच्या पूर्वजांपासून मिळालेल्या ठराविक ज्ञानाच्याआधारे पद्धती तांत्रिकदृष्ट्या विकसित केल्या आहेत. त्यांनी सामान्य जनतेशी चांगला संबंध ठेवला आहे. लोकांनी त्यांना राहण्यासाठी तात्पुरत्या जमिनी दिल्यात. जगभरातील घडामोडीमुळे ते फार कमी प्रभावित झाले असून त्यांचे जीवन निसर्गाच्या गोठ्यात, हिरव्या वातावरणात आणि गुराढोरांसोबत राहिले. जरी काही गुज्जर स्थायिक झाले तरी काही अजूनही भटक्या पद्धतीचे जीवन जगतात. जरी गुज्जर आधुनिक शिक्षण आणि आरोग्यविषयक सुविधांकडे वळले असले तरीही ते मूळ आदर्शांचे पालन करून जुन्या आणि नव्याचे योग्य संतुलन राखून ठेवतात. त्यांनी स्वतःसाठी आणि त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारात एक विशिष्ट स्थान तयार केले आहे. त्यांचेकडे कामे करण्याची स्वतःची आणि एकमेव पद्धत आहे. त्यांच्या वेगळ्या आहार जीवनशैलीमुळे त्यांना एक खास आणि अद्वितीय जमात अन्नाच्या बाबतीत ही जमात सार्वभौम आहे. म्हणून ओळखल्या जाते.

Amandeep Singh
StudentE Sher-E-Kashmir University of Agricultural Sciences & Technology of Jammu, R.S. Pura, Jammu, Jammu & Kashmir, India - 181102E
E-mail: amandeepsinghvet@gmail.com

Pranav Kumar
Assistant Professor, Division of Veterinary & Animal Husbandry Extension Education, Sher-E-Kashmir University of Agricultural Sciences & Technology of Jammu, R.S. Pura, Jammu, Jammu & Kashmir,
India - 181102
E-mail: pranavahe@gmail.com

मराठी अनुवाद : डॉ. विनोद अ. खडसे, समन्वयक, सेंद्रीय शेती

Source: Balancing the old and the new, LEISA India, March, 2017

